## समावेशक विकास

### शेती

- गहू आणि तांदूळ खरेदीसाठी 1.63 कोटी शेतक-यांना 2.37 लाख कोटी रूपये थेट प्रदान.
- देशभरात रसायने-मुक्त नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन दिले जाईल. सुरूवातीच्या काळात गंगा नदीलगतच्या 5 किमी रुंद क्षेत्रावरील शेतक-यांच्या जमिनींवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.
- कृषी आणि ग्रामीण उपक्रमांशी संबंधित स्टार्टअप्सना वित्तपुरवठा करण्यासाठी नाबार्ड तर्फे मिश्र भांडवलासह निधीप्रदान केला जाईल.
- पीक मुल्यांकन, जमिनीच्या नोंदींचे डिजिटायझेशन, कीटकनाशके आणि पोषक तत्वांची फवारणीसाठी 'किसान ड्रोन'.

### केन बेतवा नदी जोड प्रकल्प

- केन - बेतवा नदीजोड प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी 1400 कोटी रुपये खर्च.
- केन-बेतवा लिंक प्रकल्पाद्वारे शेतक-यांच्या 9.08 लाख हेक्टर जमिनीला सिंचनाचा लाभ मिळेल.

the_thinking_treet3
THRIVING FOR SUSTAINABLE FUTURE

### सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र

- उद्यम, ई-श्रम, NCS आणि ASEEM पोर्टल परस्परांशी जोडले जातील.
- 130 लाख एमएसएमईना आपत्कालीन पत हमी योजने (ECLGS) अंतर्गत अतिरिक्त पत पुरवठा करण्यात आला.
- आपत्कालीन पत हमी योजनेला मार्च 2023 पर्यंत मुदतवाढ.

- आपत्कालीन पत हमी योजनेअंतर्गत हमी सुरक्षा 50,000 कोटी रुपयांनी वाढवून एकूण 5 लाख कोटी रुपये केले जाईल.
- सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी असलेल्या पत हमी ट्रस्ट अंतर्गत सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी 2 लाख कोटी रुपये अतिरिक्त पतपुरवठा सुलभ केला जाईल.
- 6000 कोटी रुपयांच्या खर्चासह MSME ची कामगिरी वाढवणे आणि वेगवान करणे.

**कौशल्य विकास**

- डिजिटल इकोसिस्टम फॉर स्किलिंग अँड लाइव्हलीहूड (DESH-Stack e पोर्टल) सुरू केले जाईल जेणेकरून नागरिकांना ऑनलाइन प्रशिक्षणाद्वारे कौशल्य, पुन्हा मिळवण्यासाठी किंवा वाढवण्यासाठी सक्षम केले जाईल.
- ड्रोन शक्ती' आणि ड्रोन-ऍज -ए-सर्व्हिस (DrAAS) साठी स्टार्टअप्सना प्रोत्साहन दिले जाईल.

**शिक्षण**

the_thinking_treet3
THRIVING FOR SUSTAINABLE FUTURE

- PM eVIDYA चा 'वन क्लास-वन टीव्ही चॅनल' कार्यक्रम 200 टीव्ही चॅनेलपर्यंत वाढवला जाणार आहे.
- महत्वपूर्ण विचार कौशल्य आणि हुबेहूब शैक्षणिक वातावरणाला चालना देण्यासाठी आभासी प्रयोगशाळा आणि कौशल्य ई-लॅबची स्थापना केली जाईल.
- डिजिटल शिक्षकांद्वारे वितरणासाठी उच्च दर्जाची ई-सामग्री विकसित केली जाईल.
- वैयक्तिकृत शिक्षण अनुभवासह जागतिक दर्जाच्या दर्जेदार सार्वत्रिक शिक्षणासाठी डिजिटल विद्यापीठाची स्थापना केली जाईल.

**आरोग्य**

- राष्ट्रीय डिजिटल आरोग्य परिसंस्था विकसित करण्यासाठी एक खुले व्यासपीठ.
- दर्जेदार मानसिक आरोग्य समुपदेशन आणि काळजी सेवांसाठी 'राष्ट्रीय टेली मानसिक आरोग्य कार्यक्रम ' सुरू केला जाईल.
- NIMHANS हे नोडल केंद्र आणि इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी-बंगलोरचे (IIITB) तंत्रज्ञान सहाय्य प्रदान करून उत्कृष्टतेच्या 23 टेली-मानसिक आरोग्य केंद्रांचे नेटवर्क स्थापित केले जाईल.

**सक्षम अंगणवाडी**

- मिशन शक्ती, मिशन वात्सल्य, सक्षम अंगणवाडी आणि पोषण 2.0 द्वारे महिला आणि मुलांना एकात्मिक लाभ.
- दोन लाख अंगणवाड्या सक्षम अंगणवाड्यांमध्ये अद्ययावत केल्या जातील.

**प्रत्येक घरी नळाद्वारे पाणीपुरवठा**

the_thinking_treet3
THRIVING FOR SUSTAINABLE FUTURE

- हर घर, नल से जल अंतर्गत 2022-23 मध्ये 3.8 कोटी कुटुंबांना पाणीपुरवठा करण्यासाठी 60,000 कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

**सर्वांसाठी आवास**

- पीएम आवास योजनेअंतर्गत 2022-23 मध्ये 80 लाख घरे पूर्ण करण्यासाठी 48,000 कोटी रुपयांची तरतूद.

## ईशान्येकडील प्रदेशासाठी पंतप्रधानांचा विकास उपक्रम (PM-DevINE)

- ईशान्येकडील प्रदेशात पायाभूत सुविधा आणि सामाजिक विकास प्रकल्पांना निधी देण्यासाठी PM-DevINE ही नवीन योजना सुरू करण्यात आली आहे.
- या योजनेंतर्गत युवक आणि महिलांसाठी उपजीविका उपक्रम सक्षम करण्यासाठी 1,500 कोटी रुपयांची प्रारंभिक तरतूद करण्यात आली आहे.

## चैतन्यपूर्ण गावे कार्यक्रम

- विरळ लोकसंख्या, मर्यादित संपर्क सुविधा आणि उत्तर सीमेवरील पायाभूत सुविधा असलेल्या सीमावर्ती गावांच्या विकासासाठी व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्राम अर्थात चैतन्यमय गावे कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

## बँकिंग

- दीड लाख टपाल कार्यालयांपैकी 100% कार्यालये कोअर बँकिंग प्रणालीत सामील होणार
- शेड्युल्ड वाणिज्य बँका 75 जिल्ह्यांमध्ये 75 डिजिटल बँकिंग केंद्रे (DBUs) उभारणार

the_thinking_treet3
THRIVING FOR SUSTAINABLE FUTURE

## इ- पारपत्र

- चिप व भविष्यवेधी तंत्रज्ञानाचा वापर केलेली पारपत्रे दिली जाणार

## शहरी नियोजन

- बांधकाम उपनियम , शहर नियोजन योजना (TPS) व संक्रमणाभिमुख विकास (TOD) यांचे आधुनिकीकरण होणार
- शहरी भागात इ वाहनांच्या चार्जिंग केंद्रांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी बॅटरी अदलाबदल योजना सुरु करणार

## भूमी अभिलेख व्यवस्थापन

- भूमी अभिलेखांच्या माहिती तंत्रज्ञान आधारित व्यवस्थापनासाठी प्रत्येक भूखंडाला विशिष्ट ओळख क्रमांक दिला जाणार

## कंपनी बंद करण्यासाठीची प्रक्रिया वेगवान करणार

- कंपनी बंद करण्यासाठीची प्रक्रिया लवकर पूर्ण व्हावी यासाठी खास केंद्रे (C-PACE) सुरु करणार

## AVGC प्रोत्साहन कृती दल

- अनिमेशन, व्हिजुअल इफेक्ट्स , गेमिंग आणि कॉमिक उद्योगातील संपूर्ण क्षमता वापरता यावी यासाठी प्रोत्साहन कृती दल स्थापन करणार

## दूरसंचार क्षेत्र

- उत्पादन आधारित प्रोत्साहन (PLI) योजनेअंतर्गत 5G सेवांना पूरक परिसंस्था उभारण्यासाठी संरचना आधारित उत्पादनाची योजना सुरु करणार

the_thinking_treet3
THRIVING FOR SUSTAINABLE FUTURE

## निर्यात प्रोत्साहन

- विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) कायदा बदलून त्याऐवजी नवीन कायदा आणला जाणार, त्यामुळे व्यवसाय व सेवा केंद्रांच्या विकासात राज्यांना भागीदार होता येईल.

## संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरता

- 2022-23 सालात स्वदेशी उद्योगांसाठी 68 टक्के भांडवल संपादनाची तरतूद , जी 2021-22 मधील 58 टक्क्यांहून जास्त आहे.
- संरक्षण संशोधन व विकासाचे क्षेत्र शैक्षणिक क्षेत्र , उद्योग आणि स्टार्ट अप्स साठी खुले करणार
- चाचणी व प्रमाणीकरणासाठी एक स्वतंत्र संस्था स्थापित करण्यात येईल

## नवोदय (Sunrise) संधी

- कृत्रिम बुद्धिमत्ता, भू अवकाशीय (GeoSpatial) यंत्रणा, ड्रोन्स , सेमीकंडक्टर व त्याची परिसंस्था, अवकाश अर्थव्यवस्था, जेनोमिक्स व औषधनिर्माण, हरित ऊर्जा आणि स्वच्छ वाहतूक यंत्रणा, अशा नवोदय (Sunrise) संधी च्या क्षेत्रात संशोधन व विकासासाठी सरकार योगदान देणार

the_thinking_treet3
THRIVING FOR SUSTAINABLE FUTURE